# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६२४ दिनांक ०४.०८.२०२०

१.फिर्यादी महिला वय- २५ वर्ष, व्यवसाय-नोकरी, रा.नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०१/०८/२०२० रोजी सकाळी ०६:४५ वाजेचे सुमारास फिर्यादी हया नालासोपारा रेल्वे स्टेशनचे चार नंबर प्लॅटफॉमचे बाजुने पायी चालत जात असताना अनोळखी इसम यांने फिर्यादी यांचे ४५,०००/- रुपये किंमतीचे गळयातील सोन्याची चैन जबरदस्तीने खेचुन घेवुन तो डी- मार्ट कडे जाण्या-या रस्त्याने जोराने पळुन गेला आहे म्हणुन तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I ६८४/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२.फिर्यादी महिला वय ४५ वर्षे, व्यावसाय- मजुरी, रा.वाडा ता.वाडा, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२७/०७/२०२० रोजी ०९.०० वाजताचे सुमारास फिर्यादी यांचा मतीमंद मुलगा वय १४ वर्षे हा मेटा नाका येथे जाऊन येतो असे सांगुन घरातुन निघुन गेला असता त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन फुस लावुन पळवुन नेले आहे. म्हणुन वाडा पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I १७५/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३६३ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पुरुष वय ३२ वर्ष, रा.विरार पुर्व ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.०३/०८/२०२० रोजी दुपारी १२.१५ वा चे पुर्वी फिर्यादी यांचा चुलत भाऊ वय ३५ वर्षे, हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकलवरुन धानीच्या तलावाकडुन विरार फाटा बाजुकडे जाणाऱ्या रोडला टर्न मारत असतांना मोटार सायकल क्रमाक एम एच ४८ ए एम १५३७ हिचे चालकाने भरधाव वेगात येवुन मयत याचे मोटारसायकलला ठोकर मारुन अपघात करुन सदर अपघातात मयत यास किरकोळ व गंभीर स्वरुपाच्या जखमा करुन मरणास कारणीभुत झाला म्हणुन विरार पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I ६९८/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

Scanned with CamScanner